निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र आणि डिक्की यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टँड अप इंडिया' जागरूकता कार्यक्रम आयोजित

**पुणे, 2 डिसेंबर**: भारत सरकारच्या वतीने मा. पंतप्रधानजी यांच्या फ्लॅगशिप योजने अंतर्गत 'स्टँड अप इंडिया' जागरूकता कार्यक्रम दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित केला गेला. बँक ऑफ महाराष्ट्र व डिक्की यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले .

या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागातील मागासवर्गीय तरुण-तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागासवर्गीय तरुण आणि तरुणीमध्ये व्यवसायाची भावना रुजवण्यात डिक्कीला यश आले असून दिवसागणिक यामध्ये तरुणांचा उत्साह अधिक वाढत आहे . स्टँड अप इंडिया अंतर्गत येणाऱ्या बँकेच्या स्थानिक पातळीवरील अडचणींचे निवारण लवकरात लवकर करण्यात येऊन आणि यापुढे सुलभ व कमी वेळात कर्ज पुरवठा केला जाईल असेही श्री. ए बी कुमार यांनी आश्वासित केले .

कार्यक्रमप्रसंगी बँकेच्या वतीने महाव्यवस्थापक श्री विजय कांबळे ,श्री अरुण कबाडे तर डिक्कीच्या वतीने अखिल भारतीय महिला विभाग प्रमूख सौ. सीमा कांबळे , डिक्की महाराष्ट्र अध्यक्ष मुकुंद कमलाकर , डिक्की पुणे अध्दक्ष श्री राजेंद्र साळवे , श्री संतोष कांबळे , अविनाश जगताप , श्री पंकज साळवे , कु. मैत्रयी कांबळे हे उपस्थित होते .

बँक ऑफ महाराष्ट्र व डिक्की यांच्यामार्फत मागासवर्गीय नवीन उद्योजकांना स्टँड अप इंडिया अंतर्गत कर्जाची माहिती व मार्गदर्शन यापुढेही दिले जाईल असे आश्वासन कार्यक्रमा दरम्यान देण्यात आले.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 487




**छायाचित्रात : उजविकड़े व्यासपीठावर बोलतानना कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार आणि व्यासपीठावर डाविकड़े उपस्थित बँकेचे महाव्यवस्थापक श्री विजय कांबळे ,श्री अरुण कबाडे, डिक्की महाराष्ट्र अध्यक्ष मुकुंद कमलाकर**